# संत चोखोबांच्या अभंगातील वेदनेचे स्वरूप

प्रा.नवनाथ निवृत्ती बेंडे
मराठी विभाग, श्री संत गाडगे महाराज महाविद्यालय लोहा जिल्हा नांदेड

महाराष्ट्र ही संतांची व वीरांची भूमी म्हणून ओळखली जाते. संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ व संत तुकाराम यासारख्या संत महात्म्यांनी महाराष्ट्राला तेजोमय करण्याचा प्रयत्न केला .. मध्ययुगीन कालखंडात वैदिक परंपरा निष्प्रभ झालेली असताना जातीयता कर्मठपणाचे बंड वाढल्यामुळे नीती मूल्यांचा ऱ्हास झाला होता. अशा कालखंडात संतांनी खरा भक्तिमार्ग सांगून या भक्तीमार्गासोबतच मानव मुक्तीचा मार्ग स्वीकारला व त्या दृष्टीने प्रयत्न केले. तसेच परमेश्वराची, विठ्ठलाची भक्ती करण्याचा अधिकार सर्व जाती धर्मातील लोकांना व स्त्रियांना देखील आहे.हा विचार मांडून मध्ययुगीन कालखंडात आध्यात्मिक लोकशाही निर्माण करून महाराष्ट्राचे मन सुसंस्कारित व वैचारिक करण्यात संतांचे फार मोठे योगदान राहिले आहे. असा नवविचार देणाऱ्या संत महात्म्यांची फार मोठी परंपरा महाराष्ट्राला लाभली. तत्कालीन अंधश्रद्धेत खितपत पडलेल्या समाजाला अंधारातून प्रकाशाकडे व अज्ञानातून ज्ञानाकडे नेण्याचा प्रयत्न संतांनी केला. "जे जे आपणांशी ठावे।ते ते इतरांशी सांगावे ।शहाणे करून सोडावे ।सकल जना।। या उदात्त हेतूने संतांनी कार्य केले.

मध्ययुगीन कालखंडात संत ज्ञानेश्वर व संत नामदेव यांनी महाराष्ट्रात सांस्कृतिक चळवळीला सुरुवात केली. समाजाला नवे विचार दिले. कर्मकांड, यज्ञयाग, वृत्त वैकल्य, वर्णविषमता ,वेगवेगळ्या देवतांचे पूजन यासारख्या प्रथा परंपरेला विरोध केला. स्वधर्म, सामाजिक नीती व जातीभेदातीत अशी मानवतेची शिकवण सर्वसामान्यांना दिली. समाजातील जातीव्यवस्थेला धक्का न लावता स्त्री व शूद्र यांना आपल्या पंथात सामावून घेतले. देव फक्त भावाचा लंपट असून 'याती कुळ न लागे त्याला' असे स्पष्ट बजावले.'जाती कुळ वर्ण।हे अवघाची अकारण।' मानले. त्यामुळे संपूर्ण समाजात नसले तरी चंद्रभागेच्या तिरी जातीचे भेदाभेद भ्रम अमंगळ धुवून काढण्यात संतांना यश मिळाले. वारकरी संप्रदायाने सर्व जाती धर्मातील लोकांना एकत्र करून विठ्ठलाची भक्ती करण्याचा सर्वांना अधिकार आहे .असे स्पष्ट सांगितले. आठरा पगड जातीतील लोकांना एकत्र घेऊन अध्यात्मिक लोकशाही प्रस्थापित करण्याचा प्रयत्न वारकरी संप्रदायाने केला.संत ज्ञानेश्वर,संत नामदेव, गोरा कुंभार, सावता माळी, नरहरी सोनार, विसोबा खेचर, चोखामेळा, बंका महार, जनाबाई, मुक्ताबाई व कर्ममेळा अशा आठरापगड जातीतील सर्व संत एकत्र आले. व विठ्ठलाच्या भक्तीत रमून मंत्रमुग्ध झाले. एकूणच या सर्वांमुळे महाराष्ट्रात सांस्कृतिक जीवनात एका नव्या अध्यात्मिक व धार्मिक लोकशाहीला सुरुवात झाली. या अध्यात्मिक लोकशाहीला मध्ययुगीन मराठी वाङ्मयाचे अभ्यासक ल. रा. पांगरकर यांनी 'संत मेळा' असे म्हटले आहे.

या संत मेळ्यातील महत्त्वाचे संत म्हणून संत चोखोबा यांचा उल्लेख करता येतो. चोकोबांचा जन्म मंगळवेढा या ठिकाणी झाला. पुढे ज्ञानेश्वराच्या सहवासात आल्यावर त्यांच्या अमृतवाणीने चोखोबाची जडणघडण झाली. ज्ञानेश्वरांचे विचार हेच चोखोबांचे आत्मिक बळ होते. वर्णव्यवस्थेमुळे

आणि जाती व्यवस्थेमुळे चोखोबाच्या वाट्याला दुःख आले होते. जातीयतेचे चटके चोखोबांना सहन करावे लागले होते. संत ज्ञानेश्वराच्या अमृतवाणीने त्यांच्या सहवासात हीन जातीमुळे मिळणारी वागणूक वारकरी संप्रदायात त्यांना मिळाली नाही. आपली हिनत्वाची वेदना चोखोबांच्या अभंगात पदोपदी जाणवते.

"हीन याती माझी देवा। कशी घडे तुझी सेवा
मज दूर दूर हो म्हणती।तुझं भेटू कवण्या रिती
यातिहीन मज म्हणती देवा।न कळे करू तुमची सेवा"

अस्पृश्य जातीत जन्माला आल्यामुळेच आपल्याला विठ्ठलाची पूजा करता येत नाही. हे मनातील शल्य चोखोबा आपल्या अभंगातून व्यक्त करतात. एका बाजूला सर्व माणसं ही परमेश्वरांची लेकरे आहेत. असं म्हणायचं तर दुसऱ्या बाजूला यातिहीन म्हणून उपहास करावयाचा अशी समाज रीत आहे म्हणून चोखोबा आपले गाऱ्हाणे विठ्ठला जवळ मांडतात.

आपले दुःख व वेदना विठ्ठला जवळ मांडताना चोखोबा भावविवश होऊन आपली वेदना विठ्ठला जवळ प्रकट करतात. आपली वेदना ही वैयक्तिक वेदना नसून आपल्या समाजाची व जातीची वेदना मानून त्याच तीव्रतेने व उत्कटतेने व्यक्त करतात. त्यांच्या शब्दा शब्दात दुःख वेदना प्रकट होताना दिसते आणि ती अंतःकरणात जाऊन भिडते. चोखोबांच्या अभंगातील सामाजिक जाणीव तळागाळातील अस्पृश्य व शोषित माणसांच्या सामाजिक दुःख जागवणारी आहे. आपल्या वाट्याला आलेले दुःख, विषमता हे अनामिक आहेत. वास्तवातील दुःख त्यांनी आपल्या अभंगातून मांडले. पण त्या दुःखाचे मूळ येथील समाज व्यवस्थेत आहे.याचा विचार चोखोबांनी कधी केला नाही .चोखोबांना वर्णविषमतेचा फटका बसला आहे. म्हणूनच त्यांच्या अभंगातून अस्पृश्यतेची जाणीव पदोपदी व्यक्त होताना दिसते.

"जोहार मायबाप जोहार। तुमच्या महाराचा मी महार
बहु भुकेला जाहलो ।तुमच्या उष्ट्यासाठी आलो
बहू केली आस ।तुमच्या दासाचा मी दास
चोखा म्हने पाटी ।आणीली तुमच्या उष्ट्यासाठी"

अशा रूपकात्मक अभंगातून वर्णव्यवस्थेचे दुःख, वेदना.व विषमता चोखोबा मांडतात. स्वतःला दासांचा दास म्हणून घेतात. चोखोबांच्या अभंगातून जे दुःख व वेदना प्रकट होते ती वेदना अंतःकरणाला भिडल्याशिवाय राहात नाही. संत चोखोबा हे संसारी गृहस्थ होते.ते उदरनिर्वाहासाठी मोलमजुरी करत पण ते विठ्ठल नामात सतत दंग असत. गाव गाड्यातील शिवाशिवीच्या वातावरणात त्यांचा श्वास कोंडला जात होता. अशावेळी चोखोबा परमेश्वराला व विठ्ठलाला जवळ करतात.

"विठ्ठल विठ्ठल गजरी अवघी दुमदुमली पंढरी
होतो नामाचा गजर दिंड्या पताकाचे भार
निवृत्ती ज्ञानदेव सोपान अपार वैष्णव ते जाण
हरिकीर्तनाच्या दाटी तेथे चोखा घाली मिठी"

वरील अभंगातून चोखोबा आपल्या मनातील भाव विठ्ठलाजवळ व्यक्त करून विठ्ठलमय होतात.. ऊस जरी वेडा वाकडा असला तरी त्यातील रस मात्र गोड असतो. धनुष्याची कमान जरी वाकडी असली तरी त्याला लावलेला बाण वाकडा नसतो. तसेच चोखोबा हलक्या जातीत जन्माला आले तरी त्यांच्या अंतःकरणातील विठ्ठलाप्रति असलेला भाव मात्र निर्मळ व स्वच्छ असून त्यांची भक्ती मात्र श्रेष्ठ आहे चोखोबा आपल्या अनेक अभंगातून आपले आणि आपल्या समाजाचे शल्य मांडतात. 'चोखा डोंगा परी भाव नोव्हे डोंगा' या अभंगातून चोखोबाच्या मनातील वेदना आर्तभाव आणि सच्ची विठ्ठल भक्ती प्रकट होते.

"ऊस डोंगा परी रस नव्हे डोंगा।काय भुललासी वरलिया रंगा
कमान डोंगा परी तीर नव्हे डोंगा। काय भुललासी वरलिया रंगा
चोखा डोंगा परी जल नव्हे डोंगा।काय भुललासी वरलिया रंगा"

चोखोबा निर्मळ असूनही तत्कालीन समाजव्यवस्थेत भरडल्या गेले. आपल्या हिमत्वाची वेदना चोखोबाच्या शब्द शब्दात जाणवते अस्पृश्यतेची जाणीव त्यांच्या अभंगातून व्यक्त होते प्रस्थापित व्यवस्थेविरुद्ध ते आवाज उठवू शकत नाही. ते आपल्या मनातील दु:ख विठोबा जवळ व्यक्त करतात

"कोण तो सावळा ।कोण तो ओवळा ।
सर्वांशी वेगळा विठू माझा
जन्मता विटाळ ।मरता विटाळ
चोखामणे विटाळ । आदी आंती
चोखामेळा म्हणे ।मज नवल वाटते
विटाळ परते आहे कोण"

असा स्वतःशी वाद घालीत चोखोबांनी आपले दु:ख व वेदना प्रकट केली आहे. या दु:खाचे रूप हे सामाजिक व पारंपारिक स्वरूपाचे आहे. आपल्या विषयी बंड करण्याची हिम्मत चोखोबांच्या अभंगात नव्हती. वर्षानुवर्ष सामाजिक गुलामगिरी सहन करणाऱ्या समाजव्यवस्थेत वावरत असताना आपल्या दु:खाबद्दल बंड करण्याचा तो काळ नव्हता. फक्त आपले दु:ख व्यक्त करणे यापेक्षा चोखोबां वेगळे काही करू शकले नाही. पण आपल्या मनातील वेदना, पारमार्थिक दु:ख विठ्ठलापाशी कधी मनोभावे व्यक्त करावे तर कधी विठ्ठलाशी भांडावे तर कधी आपली कैफियत सादर करावी तर कधी अगतिक होऊन आपल्या हृदयाची व्यथा व्यक्त करावी. समाजातील दृष्ट प्रवृत्तीचे ढोंगाचे वाभाडे काढण्याचे काम चोखोबांनी केले. म्हणून श्री. म. माटे हे आपल्या 'महार संतांच्या मनाचे सामाजिक दुखणे' या लेखात असे म्हणतात की "चोखोबांच्या मनाचे सामाजिक दु:ख व्यक्त करणारे बरेचसे अभंग आहेत व हे अभंग चोखोबांनी अतिशय तळमळीने आणि कष्टी मनाने गायलेले आहेत. चोखोबाच्या अभंगात वेदना होती; पण त्यांच्या कर्ममेळा यांच्या अभंगात विद्रोह होता."

चोखोबाचे आयुष्य लौकिक आर्थाने उपेक्षित राहिले परंतु पारमार्थिक अर्थाने त्यांनी विठ्ठलाला केव्हाच आपलेसे करून घेतले. स्वतःच्या भक्तीवर विश्वास ठेवून भक्तीच्या बळावर चोखोबा हे संतमेळ्यात सर्वश्रेष्ठ ठरले. आपल्या जातीत राहून आपल्या कर्माने व परमार्थाने त्यांनी संत पद

मिळविले. म्हणून मराठी साहित्यातील प्रसिद्ध साहित्यिक ज्ञानपीठकार भालचंद्र नेमाडे हे संत चोखोबां यांच्याबद्दल असे म्हणतात की "चोखामेळा हा मराठी समाजाच्या प्रारंभीच्या जाती जमातीच्या कडबोळ्यातला भक्कम एकजीनसीपणाचा आधार देणाऱ्या सुरुवातीच्या काही थोर प्रतिभावंतापैकी एक प्रमुख नायक आहे"

**संदर्भ ग्रंथ-**

१)प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास- डॉ. अ.ना. देशपांडे
२) प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास- ल. रा. नसिराबादकर.
३) दलित साहित्य वेदना व विद्रोह- भालचंद्र फडके
४) प्राचीन मराठी वांग्मयाचा इतिहास- प्राध्यापक डॉ. शेळके व डॉ.भंडारे
५) संत चोखामेळा यांचे चरित्र आणि अभंग- श्री स.भा. कदम